# प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.
दि.०५/०३/२०२२

**आरोपी लोकसेवक विजय अर्जुना जाधव वय-४५ वर्ष, व्यवसाय नोकरी, शिपाई ,ग्रामपंचायत जोडगव्हाण, पंचायत समीती मालेगाव ता.वाशिम जि.वाशिम, रा.रामनगर जोडगव्हाण ता.वाशिम जि.वाशिम यांनी ५०००/- रुपयेची लाच स्विकारतांना रंगेहात पकडलेबाबत...**

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | **विजय अर्जुना जाधव वय-४५ वर्ष, व्यवसाय नोकरी, शिपाई ,ग्रामपंचायत जोडगव्हाण, पंचायत समीती मालेगाव ता.वाशिम जि.वाशिम, रा.रामनगर जोडगव्हाण ता.वाशिम जि.वाशिम** |
| लाचेची रक्कम | ५०००/-रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे आजी चे नावी मंजुर झालेले घरकुल पात्रता यादी मधुन मंजुर करण्यासाठी पंचासमक्ष ५०००/-रूपये लाच स्वीकारली. |
| सापळा अधिकारी | एस.यु. कांबळे, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

तक्रारदाराने तक्रार दिली की, त्यांनी त्यांचे आजी चे नावे ग्राम जोडगव्हाण येथे घरकुल पात्रता यादी मध्ये नाव आलेले असुन आलोसे विजय अर्जुना जाधव वय-४५ वर्ष, व्यवसाय नोकरी, शिपाई ,ग्रामपंचायत जोडगव्हाण, पंचायत समीती मालेगाव ता.वाशिम जि.वाशिम, रा.रामनगर जोडगव्हाण ता.वाशिम जि.वाशिम यांनी तक्रारदार यांचे आजीचे नावे मंजुर असलेले घरकुल पाहील्या टप्यात मंजुर करून देतो त्या करीता लाच रक्कम रूपये ५०००/- हजार ची मागणी केली. त्यांचे विरूध्द कार्यवाही होणेस विनंती आहे, अशी तक्रार दि. ०४/०३/२०२२ रोजी तक्रारदारांनी दिली.

सदर तक्रारीवरुन दि. ०४/०३/२०२२ रोजी पडताळणी केली असता विजय अर्जुना जाधव वय-४५ वर्ष, व्यवसाय नोकरी, शिपाई ,ग्रामपंचायत जोडगव्हाण, पंचायत समीती मालेगाव ता.वाशिम जि.वाशिम, रा. रामनगर जोडगव्हाण ता.वाशिम जि.वाशिम, यांनी तक्रारदाराकडून ५०००/-रूपये लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन आज दि.०५/०३/२०२२ रोजी सापळा लावला असता विजय अर्जुना जाधव वय-४५ वर्ष, व्यवसाय नोकरी, शिपाई ,ग्रामपंचायत जोडगव्हाण, यांनी तक्रारदाराकडुन ५०००/- रुपये लाच रक्कम स्विकारल्यामुळे त्यांना जवाहर नवोदय विद्यालय वाशिम समोर रंगेहात ताब्यात घेवून त्यांचे विरूध्द कलम ७ भ्रष्ट्राचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधीक्षक श्री.विशाल गायकवाड, मा.अपर पोलीस अधिक्षक श्री.अरून सावंत, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, पोलीस उपअधिक्षक गजानन शेळके, यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक एस.यु.कांबळे व स्टाफ सपोउपनि दिलीप बेलोकार, पोलीस नाईक राहुल व्यवहारे, रविंद्र घरत, विनोद अवगळे, ला.प्र.वि. वाशिम यांनी केली आहे.

शासकीय लोकसेवकाने, खाजगी इसमाने शासकीय काम करुन देण्यासाठी व करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत खालील क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन गजानन आंर शेळके , पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांनी केले आहे.

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम दुरध्वनी क्रमांक- ०७२५२/२३५९३३
टोल फ्रि.नं.- १०६४

५/३/२२

( गजानन आर. शेळके )
पोलीस उपअधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम.

Scanned by TapScanner